मंगळवार ११/०५/२०२१ अंक १९३ ४ ₹ पाने ८

# ऐक्य

http:

चैत्र अमावास्या शके १९४३ नक्षत्र भरणी ● दर्श अमावास्या (अमावास्या समाप्ती उ.

# डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी साधेपणाने साजरी



कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या समाधीस अभिवादन करताना ना. बाळासाहेब पाटील, डॉ. अनिल पाटील, डॉ. भारती पाटील, प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर व इतर मान्यवर.

बांधीलकी म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २.७५ कोटी रुपये मदत केली आहे. त्याचबरोबर संस्थेतील सर्व सेवक आणि विद्यार्थी जे या कोविड विषाणूमुळे बाधित झाले आहेत किंवा दुर्दैवाने ज्यांचा मृत्यू झाला आहे अशा सर्वांना मदत म्हणून एक कोटी वीस लाख रुपयांचा निधी उभा केला असल्याचे सांगितले. त्याचबरोबर संस्थेच्या ३९ शाखांमध्ये कोविड मार्गदर्शन व मदत केंद्र उभारले आहे याची माहिती त्यांनी पालकमंत्र्यांना दिली. भविष्यामध्ये संस्थेच्या माध्यमातून ज्या मदतीची अपेक्षा असेल ती सर्व प्रकारची मदत करण्यास संस्था कटिबद्ध असल्याचे डॉ.अनिल पाटील यांनी आ.बाळासाहेब पाटील यांना सांगितले.

यावेळी डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते ना.बाळासाहेब पाटील यांचा रयत महावस्त्र, कर्मवीर अण्णांचा चरित्र ग्रंथ आणि संस्थेची माहिती किट देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाने कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठास मान्यता दिल्याबद्दल संस्थेच्यावतीने त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.